


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १२२ •शुक्रवार, दि. ०१ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

### महादेव मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी...

# मनोज दादा जरांगे यांच्या उपस्थितीत सर्व जातीय व सर्व धर्मीय नागरिकांची बैठक !

**•दुपारी बारा वाजता शहरातील रामकषण लॉन्स येथे होणार बैठक**

**•सहभागी होण्याचे सकल मराठा समाजाचे आवाहन**

**बीड । प्रतिनिधी**

स्व. म्हादेव मुंडे यांचे कुटुंबीय न्ययाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड येथे संघर्ष योद्धा मनोज ददा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या बैठकीस सर्व जातीय व सर्व धर्मीय नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसांमध्ये दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्या अनेक घटना घडल्या. या घटनांनी संपूर्ण जिल्हा सुन्न झाला मात्र जात अंतचा लढा बीड जिल्ह्यात सुरू झाला असून बीड जिल्ह्यातील सर्व जाती धर्माच्या नागरिकांच्या उपस्थितीत मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आज दुपारी बारा वाजता शहरातील राम कृष्ण लॉन्स येथे स्वर्गीय महादेव मुंडे हत्या प्रकरणात आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीत अन्यायाची चीड असणाऱ्या प्रत्येक नागरिकांनी सहभागी व्हावे. हा जात अंतचा



लढा मानला जात असून बीड जिल्ह्यातील सुजाण नागरिक जाती धर्म वंश भेद न मानता मानवतेच्या दृष्टीने एकत्र येत आहे.

स्व. महादेव मुंडे यांची, स्व. संतोष देशमुख यांच्याप्रमाणेच निघृण हत्या करण्यात आली होती. अतिशय गंभीर प्रकरण असतानाही पोलीस आणि सरकार मूग गिळून गप्प आहेत. न्यायासाठी स्व. महादेव मुंडे यांच्या पत्नी सातत्याने आंदोलन करत आहेत. काही दिवसांपूर्वी तर अक्षरशः त्यांनी बीड पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयासमोर आंदोलन करत विष प्राशन केले होते. जर न्यायाच्या मागणीसाठी आपल्या एका भगानिला विष प्राशन करण्याची वेळ येत असेल तर ही लाजिरवाणी बाब आहे. त्यामुळे स्व. महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नसून आता स्व. संतोष देशमुख हत्याप्रकरणात न्यायासाठी ज्याप्रकारे आंदोलन केले होते त्याचप्रकारे आंदोलन उभे करावे लागणार आहे. या अनुषंगाने बीड शहरात १ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता रामकृष्ण लॉन्स येथे संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वधर्मीय, सर्वजातीय, सर्वपक्षीय बैठक होणार आहे. स्व. महादेव मुंडे व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी या बैठकीस सर्व सम ाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले असून हा एका जाती व व्यक्ती वरोधात लढा नसून अन्याय अत्याचार करणाऱ्या नीच प्रवृत्ती विरोधात लढा असल्याचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## उद्या श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे इंदोरेकर यांचे कीर्तन; ह.भ.प. नवनाथ बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताह आरंभ

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे उद्या दि.०२ ऑगस्ट शनिवार रोजी अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्य पाहिले कीर्तनरूपी पुष्प शनिवारी रात्री ०८ ते ११ वाजता समाज प्रबोधकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे कीर्तन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी



रात्री येथे होणार आहे. उद्या दि ०२ ऑगस्ट शनिवार रोजी सकाळी दीप प्रज्वलन, कलश स्थापन, कलश पूजन, गुरूची प्रतिमा पूजन श्री ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री नवनाथ बाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या हस्ते होणार आहे. नंतर गाथा पूजन, ग्रंथ

▶▶ उर्वरित पान २ वर

## ऑनलाईन बदल्यामध्ये घोटाळा

**खोट्या दिव्यांग आणि अयोग्य पती-पत्नी श्रेणीचा आधार**

### शिक्षकांनी शासनाची केली फसवणूक!

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन बदल्यांच्या २०२५ प्रक्रियेत गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. संवर्ग १ व २ मधील काही शिक्षकांनी खोट्या आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची दिशाभूल करत बदली मिळवली आहे. यामुळे अन्य पात्र शिक्षकांवर अन्याय झाला असून शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

संवर्ग १ अंतर्गत अनेक शिक्षकांनी खोटे दिव्यांग प्रमाणपत्र, मेंदूचा आजार, अँजिओप्लास्टी अशा गंभीर आजारांची बनावट कागदपत्रे सादर करून सोयीच्या शाळांमध्ये बदली करून घेतली. विशेष म्हणजे, मेंदूचा आजार दाखवूनही हे शिक्षक नियमितपणे



सेवेत कार्यरत आहेत, मग अशा व्यक्ती सेवा करण्यास फिट कसे काय, असा प्रश्न पालक आणि शिक्षणप्रेमींनी उपस्थित केला आहे.

तसेच, संवर्ग २ (पती-पत्नी एकत्रीकरण) या श्रेणीत देखील नियम मोडले गेले आहेत. शासन निर्णयानुसार, पती- पत्नीची शाळा ३० किलोमीटरच्या परिघात असणे बंधनकारक असतानाही काही शिक्षकांनी ५०-६० किलोमीटर अंतरावरील शाळा पसंतीमध्ये भरल्या. असे करताना शासनाच्या नियमांची पायमल्ली झाली आहे.

शिक्षकांनी घेतलेल्या खोट्या प्रमाणपत्रांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, ▶▶ उर्वरित पान २ वर

## परळीला 3 नवीन नायब तहसीलदारांची नियुक्ती

**माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश; महसूल व निवडणूक कामकाजाला गती येणार**

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्याला तीन नवे नायब तहसीलदार मिळाले असून, महसूल व निवडणूक विभागाच्या कामकाजात आता गती येणार आहे. माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, राज्य शासनाने अधिकृत आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार परळी तहसील कार्यालयात महसूल विभागासाठी नायब तहसीलदार पंडित सुरवसे, निवडणूक विभागासाठी अशोक भोजने यांची तर परळी उपविभागीय अधिकारी कार्यालयात महेश वाकडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बऱ्याच काळापासून परळी तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार पदे रिक्त होती. परिणामी, नागरिकांच्या महसूल व निवडणूक संबंधित कामांमध्ये अडथळे निर्माण होत होते. ही रिक्त पदे भरल्यामुळे आता कामकाज अधिक कार्यक्षमतेने पार पाडले जाणार आहे. या नियुक्त्यांमुळे तालुक्यातील प्रशासकीय कामांना चालना मिळणार असून, या निर्णयाबद्दल माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहेत.

## तलवाडा पोलीसांची सर्वोत्तम कामगिरी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवणारे दोन आरोपी गजाआड



**तलवाडा । प्रतिनिधी**

तलवाडा पोलीसांनी सर्वोत्तम कामगिरी करत अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या दोन आरोपींना शिताफीने पकडण्यात यश मिळवले असून दोन्ही आरोपींना गजाआड केल्याने नागरिकांमध्ये पोलीस दलाबाबत विश्वासहर्ता अधिकच बळावली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, गोवर्धन यलदाळे आणि सतीश उर्फ मल्ल्या माळोदे या दोन आरोपींनी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवले होते. या प्रकरणी तलवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तलवाडा पोलीस सलग दीड महिन्यापासून कसून तपास करत आरोपींचा शोध घेत होते. अखेर तलवाडा पोलीसांनी सर्वोत्तम काम गिरी ▶▶ उर्वरित पान २ वर

## ४ ऑगस्ट रोजी बीड येथे उपमुख्यमंत्री अजितदादांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड मोहिम

**१५ ते २० लाख झाडांची लागवड करून जोपासण्यात येणार**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार असून या वृक्ष लागवडीचा शुभारंभ येत्या ४ ऑगस्ट रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात होणार आहे. राज्य सरकारच्या निर्देशानुसार पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी,



हरित आवरण वाढविणे आणि सामाजिक वनीकरण चळवळीला गती देण्यासाठी राज्यात सर्वत्र महावृक्ष लागवड मोहिमेची सुरूवात करण्यात येत असून बीड जिल्ह्यातही येत्या ४ ऑगस्ट रोजी या वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होत आहे. या वृक्ष लागवडीचा शुभारंभ खंडेश्वरी देवी मंदिर परिसरातील क्रिडा विभागाच्या मैदानात करण्यात येणार ▶▶ उर्वरित पान २ वर




## बीड जिल्ह्यातील विजेच्या प्रलंबित कामांसाठी महत्त्वपूर्ण आढावा बैठक

**केज मतदारसंघातील वीज समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांचा ठोस पाठपुरावा**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध वीज प्रलंबित कामांवर तोडगा काढण्यासाठी ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत आमदार नमिता मुंदडा यांनी केज विधानसभा मतदारसंघातील वीज प्रश्नांबाबत ठोस भूमिका मांडत अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या.



आ. मुंदडा यांनी आरडीएसएस (RDSS) योजनेअंतर्गत केज मतदारसंघात नवीन ३३ केव्ही उपकेंद्र उभारण्याची, जुन्या उपकेंद्रांमध्ये अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसवण्याची आणि कृषी वाहिन्यांवरील ओव्हरलोड कमी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात ६३ केव्हीए व १०० केव्हीए क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसवण्याची जोरदार मागणी केली. तसेच, केज शहरासह ग्रामीण


▶▶ उर्वरित पान २ वर



## १ ऑगस्ट : इतिहास, संस्कृती आणि स्वाभिमान यांचा संगम

# अण्णाभाऊ साठे यांची जयंती : एक स्मरण आणि महसूल दिन

इतिहासात काही दिवस असे असतात की ज्यांचे महत्त्व एखाद्या घटनेपुरते मर्यादित राहत नाही, तर ते संपूर्ण विचारप्रवाह, चळवळ आणि समाजमनाचे प्रतिबिंब बनतात. १ ऑगस्ट हा तसा दिवस ! एका क्रांतिकारक साहित्यिकाचा जन्मदिवस, शासकीय यंत्रणेतील एक अत्यंत महत्वाचा विभागाचा गौरवदिन आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा निर्णायक टप्पा. या एका तारखेत तीन वेगळ्या वाटा आपापल्या दिशेने सुरू झालेल्या असूनही, त्या सर्वांचा अंतिम उद्देश एकच आहे – सामान्य माणसाचं जीवन अधिक न्याय्य, स्वाभिमानी आणि सन्मानित करण.



लेखणीतून उठलेला आवाज : अण्णाभाऊ साठे – १९२० च्या याच दिवशी, पुण्याच्या वद्रू बुद्रुक गावात एका वंचित कुटुंबात जन्म झाला, एका अशा व्यक्तीचा, ज्याने पुढे भारतीय साहित्यविश्वाला एक नवा मार्ग दाखवला. अण्णाभाऊ साठे – एक व्यक्ती नव्हे, तर चळवळ होती. शिक्षणाच्या संधीपासून वंचित, पण वास्तवाच्या भाषेत लिहिणारी त्यांची लेखणी ही लाखो श्रमिक, दलित आणि वंचितांच्या वेदनांची समर्थ साक्ष होती. अनुभवाच्या विद्यापीठातून शिकलेल्या अण्णाभाऊंनी लेखणी हातात घेतली आणि एक समाजजागृतीचा वणवा पेटवला. त्यांच्या कादंबऱ्या, कथा, तमाशे – हे सर्व केवळ कलाकृती नव्हत्या, तर त्या काळातील व्यवस्थेवर केलेले तीव्र भाष्य होते. 'फकीरा' या त्यांच्या अजरामर कादंबरीतून ज्या बंडखोरतेचा आवाज उमटतो, तो केवळ साहित्यात नव्हे तर समाजमनातही गाजतो. अण्णाभाऊंचा विद्रोह ही अराजकतेची हाक नव्हती, तर तो एका समतावादी समाजाच्या निर्मितीसाठी होता. त्यांनी लोककलेसारख्या तमाशाला केवळ करमणुकीपुरते मर्यादित न ठेवता, ते समाजजागृतीचं शस्त्र बनवलं. त्यांच्या लेखणीचा प्रवास हा माणसाच्या आत्मसन्मानाचा प्रवास ठरतो – तो आजही अपूर्ण आहे, पण सुरु आहे. अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त, त्यांच्या विचारांची ही ज्योत नव्या पिढीपर्यंत पोचवण्याचे आपले कर्तव्य आहे.

महसूल सेवा : शासन आणि जनतेमधील नात्याचा पूल– अण्णाभाऊंच्या जयंतीच्या दिवशीच महसूल दिन साजरा होतो. पहिल्या दृष्टीक्षेपात ही शासकीय कार्यक्रमाची चौकट वाटू शकते. पण जर आपण थोडं खोलात पाहिल, तर महसूल विभाग म्हणजे शासनाची एक अशी रचना आहे जी सर्वसामान्य नागरिकाच्या सर्वात जवळ उभी आहे.. प्रशासनातील महसूल विभाग म्हणजे ग्रामीण भारताच्या मूलभूत प्रश्नांशी झगडणारा आणि ते सुटावेत म्हणून सतत झटणारा विभाग. गावातील शेतकरी जर आपल्या सातबाऱ्याच्या उताऱ्यावर विश्वास ठेवतो, तर तो महसूल यंत्रणेवर ठेवलेला विश्वास असतो. नकाशे, फेरफार, खरेदी–विक्री, जमिनीचे हक्क, नोंदणी, आपत्तीमूल्यांकन – या सर्व प्रक्रियांच्या मागे महसूल कर्मचाऱ्यांची मेहनत असते. आणि ही मेहनत ही केवळ फाईल आणि सहीपुरती मर्यादित नसते. एखाद्या नैसर्गिक आपत्तीमध्ये गाव जलमय झालं की पावसात, चिखलात, पहिल्यांदा पोहोचणारा तलाठी असतो. नुकसानमापन करणारा मंडळ अधिकारी असतो. संकटात जनतेसाठी धावणारा तहसीलदार असतो. ही लोक फक्त सरकारी कर्मचारी नाहीत – ते संकटात तुमचे पहिले आधारस्तंभ असतात. या विभागाची परंपराही जुनी आहे. ब्रिटिश कालखंडात सुरुवात झालेली ही यंत्रणा, स्वातंत्र्यानंतर अधिक जनाभिमुख झाली. अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महसूल व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि प्रभावी झालं आहे – डिजिटल सातबारा, ऑनलाईन फेरफार नोंदणी, भूमी अभिलेख संगणकीकरण ... हे सगळं आज गावातील सामान्य माणसालाही स्पर्श करू लागलं आहे. महसूल दिन म्हणजे केवळ प्रशासकीय कार्यालयाचा उत्सव नव्हे – तर शासन आणि जनतेतील नातं दृढ करणाऱ्या कामगिरीचं स्मरण आहे.



### असहकार चळवळ

असहकार चळवळ : स्वराज्याच्या स्वाभिमानी बीजांची पेरणी– १९२० सालीच, १ ऑगस्ट रोजीच, महात्मा गांधींनी असहकार चळवळीची सुरुवात केली. ही चळवळ म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक टप्पा नव्हता – ती एक मूल्यनिष्ठ चळवळ होती. त्यावेळी जालियनवाला बागचा अत्याचार, रौलट कायद्याचा अन्याय, ब्रिटिशांच्या सत्तेचा अंधेर – या सर्वाचा रोष भारतीय जनतेत खदखदत होता. गांधीजींनी याच जनभावनेला शांततामय मार्ग दिला. त्यांनी विदेशी वस्त्रांवर बहिष्कार टाकायला सांगितल, सरकारी शिक्षण संस्था, न्यायालय यांचा त्याग करायला सांगितला. स्वदेशी ही केवळ आर्थिक संकल्पना नव्हती, ती मानसिक गुलामीपासून मुक्त होण्याची घोषणा होती. संपूर्ण देशभर असहकाराची लाट पसरली. ग्रामीण भारतात शेतकरी जागा झाला, शहरी भारतात विद्यार्थी आणि वकील रस्त्यावर उतरले. महिलांनीही यात मोठ्या प्रमाणात भाग घेतला. ही चळवळ हळूहळू स्वराज्य या संकल्पनेचं बिंब बनली. आजप, शतक उलटून गेले तरी असहकार चळवळीचा संदेश कालबाह्य झालेला नाही. अन्यायाविरुद्ध उभं राहण, तेही अहिंसेच्या मार्गाने – ही कल्पना आजही आपल्याला वाट दाखवते. संविधानिक मार्गाने लढण, जनतेचा जबाबदार सहभाग, लोकशाही मूल्यांचं रक्षण – या गोष्टी फक्त घोषवाक्य म्हणून नव्हे, तर कृतीत उतराव्यात लागतात.

१ ऑगस्ट हा दिवस आपल्याला तीन वेगवेगळ्या वाटांनी एकच गोष्ट सांगतो – सामान्य माणूसच खरा नायक आहे अण्णाभाऊ साठे यांची साहित्यिक क्रांती, महसूल अधिकाऱ्यांची नि:स्वार्थ सेवा आणि गांधीजींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलनातील जनतेचा सहभाग – हे सर्व त्या सामान्य माणसाच्याच स्वाभिमानाचे विविध रूप आहेत. या तीन घटनांचा एकत्रित अर्थ असा की, देशाच्या उभारणीसाठी केवळ लढणं पुरेस नाही, तर समाजाला समजून घेणं आणि सक्षम करणंही तितकच आवश्यक आहे. आपण या दिवशी कोणत्याही एका घटनेकडे पाहून उत्सव साजरे करू शकतो. पण जर आपण या तिन्ही घटनांकडे एकत्र पाहिल, तर आपल्याला एक मोठ चित्र दिसतं – सामान्य माणसाच्या अधिकारांच, संधींच आणि न्यायाच ! हे दिवस केवळ स्मरणाचे नसावेत ; ते प्रेरणेचे, आत्मपरीक्षणाचे आणि कृतीचे असावेत.



**–चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार, बीड**

## उपेक्षितांचे नेतृत्व; मनोज जरांगे पाटील



गेल्या दोन वर्षांपासून मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी आरक्षण आंदोलन चालू केले आहे. त्यांना राज्यभरात चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचे केलेले अवलोकन. एक ऑगस्ट १९८२ रोजी जरांगे पाटलांचा जन्म शिरूर तालुक्यातील मातोरी जिल्हा बीड येथे झाला. अतिशय अल्पशिक्षण घेऊन त्यांनी समाजकार्याला सुरुवात केली. आंतरवली सराटी येथे त्यांनी आपले आंदोलनाचे केंद्र बनवले.

गेल्या वीस वर्षांपासून ते या समाजासाठी आंदोलन करत आहेत. मोर्चे धरणे उपोषणे इत्यादी लोकशाही आयूध्याच्या माध्यमातून त्यांनी हा विषय ऐरणीवर आणला. २९ ऑगस्ट २०२३ ला आंदोलन तीव्र केले व त्यांच्या आंदोलनाला राज्यव्यापी स्वरूप प्राप्त झाले. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री इत्यादी मंडळी त्यांच्या आंदोलन स्थळी येऊन गेली. २६ जानेवारी २०२४ ला जरांगे पाटलांनी विराट मोर्चा मुंबईला नेला आणि या विराट मोर्चाची दखल राज्य सरकारला घ्यावी लागली व काही अंशी मागण्या मान्य करण्याचे आश्वासन सरकारने मोर्चेकरी जरांगे पाटलांना दिले. मराठवाडा महाराष्ट्रात काही लोकांना कुणबी प्रमाणपत्रे मिळू लागली तरी जरांगे पाटील थांबले नाहीत त्यांनी उपोषणे आंदोलने चालूच ठेवली. आता २९ ऑगस्ट २०२५ ला त्यांनी मुंबईवर मोर्चा नेण्याचे प्रयोजने आहे तरी जरांगे पाटलांना या मोर्चात उत्तम प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे. या त्यांच्या कार्याबद्दल त्यांचा मराठा समाज अत्यंत आभारी आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना कोटी कोटी शुभेच्छा. त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो एवढीच ईश्वरचरणी प्रार्थना. जय हिंद जय महाराष्ट्र.



**– नामदेव लोंढे**

◆ पान ९ वरून पुढे...

### मनोज दादा...

सांगितले जात आहे. स्वर्गीय महादेव मुंडे यांची हत्या होऊन २१ महिन्याचा कालावधी लोटत आला अद्यापही या प्रकरणात प्रमुख आरोपींना अटक करण्यात आलेली नाही. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्यानंतर राज्यभरात जी लोक आंदोलन झाली त्यामुळेच मारेकऱ्यांना जेरबंद करण्यात आले. स्वर्गीय महादेव मुंडे हत्या प्रकरणात राज्यभर लढा उभा करण्यात येणार आहे यासाठी मुंडे कुटुंबीयांच्या पाठीशी सर्व समाज असून या संदर्भात बीड येथे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

### उद्या श्री क्षेत्र...

ज्ञानेश्वरी पूजन, टाळ मृदुंग वीण पूजन होईल व्यासपीठ पूजन झाल्यानंतर फुल टाकण्याचा कार्यक्रम होणार आहे. ह.भ.प. माधव महाराज डाके ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक यांचे प्रवचन होणार आहे. प्रवचन झाल्यावर कीर्तन व संगीत भजन नंतर हरी जागर होणार आहे.श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी परिसरातील भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

### ऑनलाईन बदल्यामध्ये...

अशी मागणी संबंधितांनी केली आहे. शिक्षण विभागाने याची गंभीर दखल घेऊन त्वरीत तपास आरंभ करावा. संवर्ग तपासणी विषय

◆ पान ९ वरून पुढे...

आक्षेप शासन नियम उल्लंघन संवर्ग १ दिव्यांग प्रमाणपत्र मेंदू आजार, अँजिओप्लास्टीसारखी खोटी वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर खोट्या आरोग्य कागदपत्रांवर बदली संवर्ग २ पती–पत्नी एकत्रीकरण श्रेणी ३० किमीच्या बाहेर शाळा पसंती भरली शासन निर्णय दिनांक ३०.०४.२०२१ चे उल्लंघन दोन्ही प्रमाणपत्र पडताळणी आवश्यक ऑनलाईन प्रणालीतील त्रुटींचा गैरफायदा पारदर्शकतेचा अभाव ही बाब अत्यंत गंभीर असून, सदर शिक्षकांची कागदपत्रे जिल्हा पातळीवर पुन... पडताळण्यात यावी व जे दोषी सापडतील त्यांच्यावर शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे होत आहे.

### तलवाडा पोलीसांची...

करत तांत्रिक माहितीचा उपयोग, व गुप्त माहीती आणि जिद्द चिकाटीच्या आधारे आरोपींना शिताफीने ताब्यात घेण्यात आले. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. राजगुरू आणि सहायक पोलीस निरीक्षक श्री. निलंगेकर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पार पडली. ही कारवाई पो.उपनि श्री. शाम गायकवाड, पोह. हनुमान जावळे, पोअं. विकास थोरात यांनी केलेल्या अथक प्रयत्नातून व उत्तम समन्वय साधून पार पाडली.पोलीस प्रशासनाच्या या वेळीवेळी घेतलेल्या कठोर पावलांमुळे गुन्हेगारांमध्ये धडकी भरली असून, नागरिकांनी पोलीसांप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

◆ पान ९ वरून पुढे...

### ४ ऑगस्ट ...

आहे. ही वृक्ष लागवड मोहिम शासकीय गायरान जमिन, शासकीय कार्यालय परिसरातील शिल्लक असलेली जागा, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांना या वृक्ष लागवड मोहिमेमध्ये सहभागी करून घेण्यात येणार आहे. या वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ करणे आणि नियोजन करणे यासाठी याचे नियोजनासाठी जिल्हा प्रशासनाने तगडे नियोजन केले असून नियोजनात कोठेही कसून राहु नये यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन विभागाच्या सभागृहामध्ये जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीमध्ये ही बैठक होत आहे. या वृक्ष लागवडीसाठी प्रत्येक शासकीय विभागातील एका अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. आजच्या बैठकीसाठी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, अप्पर जिल्हाधिकारी धार्मिक, अंबाजोगाईचे अप्पर जिल्हाधिकारी, अप्पर पोलीस अधिक्षक, अतिरि मुख्य कार्यकारी अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांसह जवळपास सर्वच खाते प्रमुखांची बैठक होत आहे.

### बीड जिल्ह्यातील...

भागातील उच्चदाब (HT) व निम्नदाब (ड्ढ) लाईनचे पोल आणि तारा निकृष्ट अवस्थेत असल्याने त्यांचे तातडीने बदल करावेत, अशीही आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

◆ पान ९ वरून पुढे...

सौर कृषी वाहिनीअंतर्गत सुरू असलेली अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, रिक्त अभियंता पदे भरण्यात यावीत, अशी ठोस भूमिका त्यांनी मांडली. कोरेगावसारख्या गावांचा आरडीएसएस योजनेत समावेश करून नवीन ११ केव्ही लाईन मंजूर करण्याची, विविध उपकेंद्रांवर आयसोलेटर बसवण्याची, ट्रान्सफॉर्मर ऑईल आणि नव्या ट्रान्सफॉर्मरची उपलब्धता सुनिश्चित करण्याची मागणीही त्यांनी केली.

वाघाळा, आडस, पाथरा येथे १३२ केव्ही आणि बरड येथील २२० केव्ही उपकेंद्रांपासून नवीन ३३ केव्ही फीडर टाकण्यासाठी योजना राबवण्याची गरज त्यांनी मांडली. युसुफवडगाव, धनेगाव, जवळबन, साळेगाव या उपकेंद्रांमध्ये व्हिसीबी, सीटी, पीटी, आयसोलेटर व अर्थिंगची दुरुस्ती करून त्यांची क्षमता वाढवण्यावरही भर दिला. अंबाजोगाई उपविभागात नवीन दोन उपविभाग तयार करावेत, पठाण मांडवा गावाचा अंबाजोगाई विभागात समावेश करावा, तसेच ५१९ उच्चदाब व ४८९ लघुदाब पोल, १०७ वितरण बॉक्स बदलण्याची, ४७ किलोमीटर नवीन ११ केव्ही लाईन उभारण्याची आणि शेती फिडरवरील भार कमी करण्यासाठी २२ लाईन कपॅसीटर बसवण्याची तातडीची गरज त्यांनी बैठकीत ठळकपणे मांडली. अंबाजोगाईतील कनिष्ठ व सहाय्यक अभियंत्यांच्या रिक्त पदांची भरती त्वरीत करावी यासाठीही त्यांनी ठोस पाठपुरावा केला. आ. नमिता मुंदडा यांच्या या ठोस भूमिकेमुळे केज आणि अंबाजोगाई भागातील नागरिकांना दर्जेदार वीज सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची आशा निर्माण झाली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

### रस्त्यासाठी पाण्याच्या...

तक्रारीच्या अनुषंगाने केजचे तहसीलदार यांनी दि.३० जुलै रोजी सकाळी ११ वाजता रस्ता मोकळा करण्यासाठी तलाठी, मंडळ अधिकारी व भूमी अभिलेख अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे लेखी आदेश दिले होते. ठरलेल्या वेळेत गैरअर्जदार शेतकरी व तक्रारदार शेतकरी घटनास्थळी उपस्थित होते. तहसील कार्यालयाचे प्रतिनिधी म्हणून मंडळ अधिकारी संतोष देशमुख व तलाठी श्रीमती. चव्हाण हे उपस्थित होते. मात्र, पोलीस आणि भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी अनुपस्थित राहिल्याने प्रत्यक्ष कार्यवाही होऊ शकली नाही. त्यामुळे दशरथ आकुसकर यांच्यासह तक्रारदार शेतकऱ्यांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

### बाल संरक्षणावर ...

कार्यशाळेमध्ये जिल्हाधिकारी तथा जिल्हा बालविवाह प्रतिबंधक कृती दल समितीचे अध्यक्ष विवेक जॉन्सन (भा.प्र.से.) कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान (भा.प्र.से.), असणार आहेत. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा महिला व बालविकास अधिकारी मा. फारूक शेख यांचीही उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन एच. पी. देशमुख, प्रकल्प संचालक, युवा ग्राम विकास मंडळ यांनी केले आहे. हा उपक्रम बालकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार असून, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले आहे.

### सामाजिक व धार्मिक...

अविनाश कांडुरे कैलास खुरपे पवन मोगरेकर बाळासाहेब क्षीरसागर उमेश जाधव रामेश्वर चव्हाण सुभाष कांबळे संतोष जाधव गौरी देशमुख

◆ पान ४ वरून पुढे...

पूजा मुंडकर चित्रा पाठक अनिता अलकुंटे, शरद कचरे दत्ता क्षिरसागर, मनोज कोरडे नामदेव मुळे राम शिंदे दत्ता महाजन नारायण मेंडके सिद्धेश्वर राठोड प्रदीप जाधवर भरत जोशी रवी गायकवाड गंगाधरराव आगे, रामराव जाधव, विष्णू आगे कल्याण शेप, सचिन तौर, बाळासाहेब साळवे भारती घुबडे, कमलाकर जोशी, जीवन कोरडे, अशोक कीर्ते, नितीन डुकरे, दीपक गरड, ,. मनमथ लांडगे, मयूर राऊत व राजेभाऊ सरवदे यांची होती.

### छाया पांचाळ...

छाया पांचाळ यांचे पती गणेश पांचाळ यांनी न्यायासाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे. छाया पांचाळ यांचा १३ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा रुग्णालयात प्रसुतीनंतर अतिरक्तस्रावामुळे मृत्यू झाला होता. यासंदर्भात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणि नर्सची हलगर्जीपणा जबाबदार असल्याचा आरोप करण्यात आला असून मृत महिलेच्या भावाने पोलिस ठाण्यात लेखी तक्रार देत एफआयआर दाखलही केला आहे. या प्रकरणाची चौकशी समिती नेमण्यात आली असून त्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र चौकशी अहवालाच्या आधारे मुख्य दोषींना वाचवून फक्त परिचर मावशी यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. केलेली कारवाई मान्य नसून त्यामुळे संपूर्ण प्रकरण रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला अशा प्रकारचं असल्याची टीका आंदोलकांनी केली आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नर्स यांना वाचवण्याचा प्रयत्न केला असून त्यामुळे त्यांच्यासह डॉक्टर व नर्स वरती प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच मयत छाया पांचाळ यांच्या कुटुंबीयांना आर्थिक २५ लाखाची मदत देण्याची मागणीही करण्यात आली आहे. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ०४ ऑगस्ट रोजी (सोमवार) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर न्यायासाठी आंदोलन करण्यात येणार आहे, अशी माहिती किष्किंधा पांचाळ आणि गणेश पांचाळ यांनी निवासी

◆ पान ४ वरून पुढे...

उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केली आहे.न्यायाच्या प्रतीक्षेत असलेले पांचाळ कुटुंब आता थेट प्रशासन दरबारी लढाईला सज्ज झाले असून, प्रशासनाने यात योग्य ती कारवाई न केल्यास सामाजिक रोष भडकण्याची शक्यता नाकारता येणार नाही असेही किष्किंधा पांचाळ म्हणाल्या . महत्वाचे मुद्दे: प्रसुतीनंतर मृत्यू – वैद्यकीय अधिकाऱ्यांची हलगर्जी, चौकशी अहवाल असूनही दोषी डॉक्टर, नर्स यांना अभय, मावशीवर निलंबन – अन्यायकारक कारवाईचा आरोप तर निलंबन अमान्य., जिल्हा शल्यचिकित्सकांवर कारवाईची मागणी, ४ ऑगस्टला आंदोलनाची घोषणा

### टिपरे महोत्सवात....

३० जुलै रोजी गेवराई शहरातील बाजार तळावर टिपरे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शंभर वर्षाची परंपरा लाभलेल्या टिपरी व सोंग कला प्रकाराचा आस्वाद घेण्यासाठी गेवराई शहरातील तसेच परिसरातील महिला मुले आणि नागरिकांनी गर्दी केली होती. स्पर्धेमध्ये ११ संघ सहभागी झाले होते. टिपरे स्पर्धेत प्रथम ओम ग्रुपला रोख ३३३३३ रुपये व स्मृतिचिन्ह, द्वितीय संघर्ष ग्रुपला रोख २२२२२ रुपये व स्मृतिचिन्ह, तृतीय जगदंबा ग्रुपला रोख ११११११ रुपये व स्मृतिचिन्ह आणि उत्तेजनार्थ रोख ५५५५ रुपये व स्मृतिचिन्ह अनुक्रमे सावतानगर व झुंजार ग्रुपला प्रदान करण्यात आले. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये प्रथम पारितोषिक रोख रुपये ५००० आणि स्मृतिचिन्ह झुंजार गटाच्या स्पर्धकाला मिळाले. फासावर लटकलेला शेतकरी हे पात्र त्यांनी सादर केले होते. द्वितीय पारितोषिक रुपये ३००० रोख व स्मृतीचिन्ह यांना तर तृतीय पारितोषिक रोख रुपये २००० व स्मृतीचिन्ह क्रांती ग्रुपच्या बंजारा महिलेचे वेशभूषा केलेल्या कलाकाराला. उत्कृष्ट पात्र सजावटीमध्ये लक्षवेधी पात्र सजावट मध्ये रोख रुपये १००९ व स्मृतिचिन्ह अनुक्रमे शिवछत्र ग्रुपच्या काळा शंकर, गणेशनगरच्या अर्धनारी नटेश्वर, अमिताभ बच्चनची वेशभूषा केलेला कलाकर, बळीवंश मोटे ( नृत्यांगना), कुचीपुडी संघर्ष ग्रुप, कृष्णाचे

◆ पान ४ वरून पुढे...

निळी वेशभूषा छत्रपती ग्रुप तर झुंजार ग्रुपच्या पांढरी चेटकीन या पात्रात मिळाले. उत्कृष्ट उत्कृष्ट सोंग मध्ये प्रथम रोख ५००० व स्मृती चिन्ह कोळी परिवाराचे सोंग घेतलेल्या कलाकारांना मिळाले तर द्वितीय रोख ३००० रुपये व स्मृतीचिन्ह जगदंबा ग्रुपच्या सिंधुताई सपकाळ यांचे सोंग घेतलेल्या कलाकाराला मिळाले. तृतीय रोख २००० रुपये व स्मृतीचिन्ह गणेश नगर ग्रुपच्या छत्रपती शिवरायांची वेशभूषा केलेल्या कलाकाराला मिळाले. उत्तेजनार्थ पारितोषिक रोख १५०० व स्मृतिचिन्ह सावता नगर ग्रुपच्या बाल वधू या सोंगाला मिळाले. उत्कृष्ट वाद्य वादन वैयक्तिक मध्ये प्रथम पारितोषिक रोख ३०००रुपये व स्मृतिचिन्ह ओम ग्रुपच्या अमरदीपला मिळाले. द्वितीय पारितोषिक रोख २००० रुपये व स्मृतिचिन्ह क्रांति ग्रुपच्या पद्माकरला संबळ वादनाबद्दल मिळाले. तृतीय पारितोषिक रोख १५०० महेश दाभाडे यांना प्रदान करण्यात आले. उत्तेजनार्थ अनुक्रमे रोख १००० रुपये व स्मृतिचिन्ह गणेश नगरच्या दिलीप मोटे आणि लल्ला उमाप यांना उत्कृष्ट वादनाबद्दल प्रदान करण्यात आले.

### रेड रिबन...

घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा व आपले चारित्र्य चांगले ठेवावे असे अवाहन उपस्थित विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन समुपदेशक श्री जनार्धन माचपल्ले यांनी केले प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्रीमती राजश्री हिवरेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतते साठी जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री सुहास कुलकर्णी, जिल्हा सहाय्यक – सनियंत्रण व मुल्यमापन श्री फारोकी एफ आर, जिल्हा सहाय्यक – लेखा श्री नवनाथ चव्हाण, आयसीटीसी जिल्हा रुग्णालय बीड येथील समुपदेशक श्री जनार्धन माचपल्ले, श्रीमती हिवरेकर राजश्री, डिएसआरसी समुपदेशक श्री रामभाऊ घनगाव प्रयोग शाळा तंत्रज्ञ श्री एम एस इंगळे, व्हॅन अटेंडंट श्री दिलीप औसरमल, इत्यादीनी विशेष परीश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 159 कोटींच्या नगररोडच्या दर्जाहिन कामामुळे वकिलाचा मृत्यू; तिप्पटवाडी फाट्याजवळ एकाच बाजूने वाहतूक

## ४ महिन्यातच उखडलेल्या ,भेगा पडलेल्या रस्त्याची दुरुस्ती तरीही अभियंता राजेंद्र भोपळे म्हणतात काम दर्जेदारच : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून रखडलेल्या बीड - अहिल्यानगर या २४ .५ किलोमीटर रस्त्याच्या कामाला सव्वा वर्षापुर्वी सुरूवात झाली. डिसेंबर २०२४ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र अद्यापही काम पूर्ण झालेले नाही. विशेष म्हणजे ४ महिन्यांपूर्वी तयार केलेल्या सिमेंट रस्त्याला काही ठिकाणी खड्डे,तडे गेल्याने,भेगा पडल्याने दुरुस्ती करण्यात येत आहे. या १५९ रूपये किंमतीच्या बेसुमार दर्जाच्या रखडलेल्या कामामुळे काल एका वकील तरुणाला आपला जीव गमवावा लागला असुन याची जबाबदारी कोणाची असा संतप्त सवाल





सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे. बुधवार दि.३० रात्री शहरानजीकच्या तिप्पटवाडी फाट्याजवळ हा अपघात झाला असुन वैभव महारूद्र सांगळे वय २५ वर्षे रा.उक्कडपिंप्री ता.गेवराई असे अपघातात ठार झालेल्या तरुण वकिलाचे नाव आहे.४ महिन्यापुर्वीच तयार केलेल्या रस्त्याला तडे,भेगा पडल्याने उकडलेल्या ,भेगा पडलेल्या ठिकाणी दुरुस्ती सुरू आहे. त्यासाठी एका बाजूचा रस्ता बंद केल्याने दोन्ही बाजूंची (अहिल्यानगर कडून येणारी आणि बीड कडुन जाणारी वाहने) वाहतूक एकाच बाजूने सुरू राहिली. दरम्यान दुचाकीला कारने धडक दिली. यात गंभीर जखमी झालेल्या वैभव सांगळे या तरुणाचा मृत्यू झाला. वैभव दुचाकीवरून राजुरीकडून बीड कडे येत असताना समोरून आलेल्या कारची दुचाकीला धडक बसून हा अपघात झाला. अनेक वर्षापासून रखडलेल्या बीड - अहिल्यानगर या महामार्गाच्या २४.५ किलोमीटर रस्ता काम ासाठी १५९ कोटी रुपयांचा निधी केंद्रीय महामार्ग निधीतुन उपलब्ध झाला आहे. जून २०२४ मध्ये रस्ता कामाची सुरुवात झाली. डिसेंबर २०२४ पर्यंत काम करण्याची मुदत होती. मात्र काम संथगतीने सुरू असल्याने तीन किलोमीटर रस्ता पूर्ण झालेला नाही. तसेच नाली व दुभाजकाचे कामही अनेक ठिकाणी अपूर्ण आहे. कामाच्या विलंबाबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी साकेत कन्स्ट्रक्शन कंपनीवर १ कोटी रुपयांचा दंड ठोठावुनही सुधारणा झालेली नाही. दरम्यान ४ महिन्यापूर्वी सिमेंट रस्ता बांधूनही उखडलेल्या भेगा पडलेल्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे.

तब्बल १५९ कोटी रुपये खर्चून करण्यात येत असलेल्या नगररोडचे काम ४ महिन्यांपूर्वीच झालेल्या रस्ते कामाला काही ठिकाणी खड्डे तर काही ठिकाणी तडे,भेगा पडलेल्या आहेत. संबंधित प्रकरणात तक्रार केल्यानंतर महामार्ग प्राधिकरण बीड विभाग अभियंता राजेंद्र भोपळे म्हणतात सिमेंटचा थर देताना चुकुन रेक्झिनचा एक बंच क्रांक्रीटम ध्ये गेला होता तो काढताना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर खड्डे पडलेलेले आहेत.खड्डे बुजविण्यात आले असुन काम दर्जेदारच झाले आहे.आठ ते दहा ठिकाणी उकडलेल्या,भेगा पडलेल्या रस्त्याच्या ठिकाणी दुरूस्तीचे काम सुरू असुन काम करताना बॅरिकेट्स व तत्सम सर्व उपाययोजना करून दिशादर्शक ही लावण्यात आले आहेत. असे म्हणत दर्जाहीन कामाला दर्जेदार कामाचे प्रशस्तिपत्र देऊन टाकत आहे. एकंदरीतच डॉ.राजेंद्र भोपळे कंत्राटदाराची पाठराखण करताना दिसुन येत आहे.

## आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्यामुळे... अखेर...

# स्व.महादेव मुंडे खून प्रकरणी विशेष तपास यंत्रणेची स्थापना ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

गेल्या २१ महिन्यांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या स्व. महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणी अखेर विशेष तपास यंत्रणा एसआयटीची स्थापना करण्यात आली असून त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिले आहेत आमदार सुरेश धस यांनी या हत्याप्रकरणी बसत्यात बांधलेला तपास करायला भाग पडल्याने अखेर विशेष तपस यंत्रणा स्थापन करण्यात आले असून यांच्या वतीने पुढील तपास करण्यात येणार आहे त्यामुळे स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे या प्रकरणात सातत्याने आवाज उठवत, न्यायासाठी लढा देणारे आमदार सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे मुळेच आज मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी विशेष तपास पथक (S.I.T.) स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत.

आ. सुरेश धस यांनी आज मुंबईत स्व. महादेव मुंडे यांची पत्नी सौ. ज्ञानेश्वरी मुंडे व त्यांच्या कुटुंबीयांना सोबत घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत आमदार धस यांनी संपूर्ण प्रकरणाचे गंभीर तपशील, खरे आरोपी कोण आहेत तसेच आरोपींना मदत करणारे पोलीस अधिकारी कोण आहेत याची सविस्तर माहिती मुख्यमंत्र्यांसमोर ठामपणे मांडली. मुख्यमंत्री मा. श्री. फडणवीस साहेबांनी या प्रकरणाची भावनिक व गांभीर्याने दखल घेत त्वरित पोलीस उपमहानिरीक्षक (DIG) यांना S.I.T. स्थापन करण्याचे स्पष्ट आदेश दिले. या निर्णयामुळे मुंडे कुटुंबीयांना मोठा मानसिक आधार मिळाला असून, सत्य बाहेर येईल आणि गुन्हेगार कायद्याच्या तावडीत सापडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.स्व. महादेव मुंडेंना न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही, असा ठाम निर्धार आमदार सुरेश धस यांनी या प्रसंगी पुन्हा एकदा व्यक्त केला.



*बीड: भाजपा च्या आ. नमिता ताई अक्षय मुंदडा व जेष्टनेते मा. नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांनी सुहास पाटील यांच्या निवासस्थानी भेट दिली, काही दिवसापूर्वी सुहास पाटील यांच्या पोटाची शस्त्रक्रिया संभाजी नगर येथे करण्यात आली त्यांच्या या शस्त्रक्रियेची आस्थेवाईक पणे चौकशी करून लवकरात लवकर समाजकारण व राजकारणात पुन्हा सक्रिय व्हावे हि सदिच्छा व्यक्त केली तसेच पाटील दाम्पत्याला आहेर केला याप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे संचालक मा, रामकृष्णजी बांगर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मा. अशोकराव हिंगे, उद्योगपती मा. आप्पा सांहेब जगताप, डॉ. अरविंद काकडे, अँड. राम औटी, मा. शेखर महाद्वार, मा. पाडुरंग होमकर, मा. वैजिनाथराव कदम मा.शरदजी इंगळे , बाळासाहेब कुलकर्णी, मा. सुनिल कुलकर्णी, मा. बाबासाहेब पाटील, मा. कैलास शेजाळ ,ओकार पाटील , शुभम जाधव, भारतराव काळे, बबनराव आंधळे.*

# बीड-अहिल्यानगर-मुंबई रेल्वे सुरु करा

### बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड-अहिल्यानगर या रेल्वे मार्गाचे विद्युतीकरणाचे काम पुर्णत्वास येत असून बीड,अहिल्यानगर,मुंबई या म ार्गावरती प्रवासी रेल्वे चालू करावी अशी मागणी बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समीतीच्या काल झालेल्या बैठकीत करण्यात आली. या बाबत सविस्तर माहिती अशी की, काल बीड जिल्हा स्वातंत्र्य सैनिक रेल्वे कृती समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री.सत्यनारायणजी लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या निवासस्थानी कृती समितीची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीमध्ये प्रामुख्याने अहिल्यानगर बीड परळी या मार्गावरील रेल्वेच्या कामाच्या संदर्भात तसेच विद्युतीकरणाच्या कामा संदर्भात चर्चा करण्यात आली. या सोबतच कृती समितीच्या अध्यक्षांनी या मार्गावरील कामाच्या संदर्भातील आढावा या बैठकीत मांडला. या सोबतच या बैठकीमध्ये रेल्वेच्या अहिल्यानगर बीड परळी मार्गावरील ज्या काही आडीअडचणी असतील त्या संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील रेल्वे कामाच्या सर्वे संदर्भात चर्चा करण्यात आली तसेच धाराशिव, बीड, आहिल्यानगर या मार्गावरील कामाचा देखील आढावा या बैठकीत घेण्यात आला. तसेच बीड, आहिल्यानगर, मुंबई या मार्गावर रेल्वेचे विद्युतीकरणाचे काम पुर्ण होत असून बीड, अहिल्यानगर,म ुंबई ही प्रवाशी रेल्वे सुरू करण्यात यावी. बीड ,अहिल्यानगर, मुंबई ही प्रवाशी रेल्वे प्रामुख्याने चालु करण्यात यावी अशी मागणी रेल्वे मंत्र्यांना भेटून करण्याचे बैठकीत ठरले.

# अखंड सप्ताह व श्रावणी सोमवार निमित्त गोरक्षनाथ टेकडी येथे एस.टी.बस सुरु करा : भाऊसाहेब डावकर

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील अखंड हरिनाम सप्ताह दि.०२/०८/२०२५ शनिवार या दिवशी आरंभ होत असून सांगता ही दि.०९/०८/२०२५ रोज शनिवार या दिवशी होणार असून या सप्ताहाच्या कालावधीत लाखो भाविक-भक्त या ठिकाणी येत असतात. त्यासाठी परिवहन महामंडळाने त्या ठिकाणी बस सेवा सुरु करावी व भविक भक्तांची गैरसोय टाळावी अशी मागणी निवेदनात गोरक्षनाथ टेकडीचे सेवक भाऊसाहेब (काका) डावकर यांनी केली आहे.

संबंधीत विषयी सविस्तर निवेदन देताना त्यांनी म्हटले आहे की, श्री.ह.भ.प.वै. सद्गुरु किसन बाबा (महाराज) यांच्या २७ व्या पुण्यतिथी निमित्त ह.भ.प.शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री.नवनाथ बाबा (महाराज)



मठाधिपती श्री.क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या अखंड सप्ताहासाठी बीड जिल्ह्यातूनच नव्हे तर महाराष्ट्रातून भावीक भक्त त्या ठिकाणी येतात. टेकडी फाटा ते गोरक्षनाथ टेकडी जवळपास अडीच कि.मी.चा रस्ता आहे. बीड वरुन ढेकणमोहा किंवा घाटसावळी येथे महामंडळाच्या बसेस थांबतात. मग तेथून ६-७ कि.मी. पाई जावे लागते. खाजगी वाहनापासून धोका निर्माण होऊ शकतो. त्या अनुषंगाने एस.टी.महामंडळाने बीड ते गोरक्षनाथ टेकडी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाच्या सात दिवसाच्या कालावधीमध्ये बसेस सोडल्या तर भाविक-भक्तांची होणारी हेळसांड थांबेल. गोरक्षनाथ टेकडीवर श्रावण महिन्यातील या सप्ताहाला व श्रावणी सोमनवारला खूप महत्व असते म्हणून लाखो भाविक भक्त तिथे येतात. सप्ताह मोठा असतो, जनतेची,भाविक-भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून गोरक्षनाथ टेकडीवर सप्ताहाच्या निमित्ताने व श्रावण महिन्यातल्या सोमवारी बससेवा सुरु करावी असे निवेदन गोरक्षनाथ टेकडीचे सेवेकरी भाऊसाहेब काका डावकर, सरपंच तेजाब चव्हाण, बिभीषन जगताप, प्रभाकर डेमरे, सचिन जाधव,फौजी मारुती शिंदे, राहुल जाधव, उत्तरेश्वर जाधव, श्रीराम बुवा पुरी,अनंत थोरात आदीनी राज्य परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक यांच्याकडे दिले आहे.

## गणेश गायकवाड यांचे निधन



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथील रहिवाशी गणेश संभाजी गायकवाड वय ५८ वर्ष यांचे हृदयविकाराचा तीव्र धक्क्याने बुधवार सायंकाळी हैद्राबाद येथे दुःखद निधन झाले. त्यांच्यावर आनंदगाव येथील शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी ,दोन मुले ,दोन मुली, चार भाऊ, जावई असा मोठा परिवार आहे. बप्पा म्हणून ते सर्वपरिचित होते.ते माजी सरपंच ज्ञानेश्वर गायकवाड,बाबासाहेब गायकवाड यांचे बंधू होत

## मनोजदादा जरांगे पाटील व स्व.महादेव मुंडे कुटुंबीय यांच्या उपस्थित होत असलेल्या ...

# आजच्या व्यापक बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित रहा : आ.संदीप क्षीरसागरांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

स्व.महादेव मुंडे यांचे कुटुंबीय न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी बीड येथे संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असलेल्या बैठकीस मी येत आहे, तुम्हीही या असे आवाहन आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



परळी येथील स्व.महादेव मुंडे यांची हत्या होऊन २० महिने उलटले आहेत. १८ महिन्यांपासून आरोपी कोण याचाच पोलीसांना शोध लागलेला नाही. स्व.महादेव मुंडे यांची, स्व.संतोष देशमुख यांच्याप्रमाणेच निघृण हत्या करण्यात आली होती. अतिशय गंभीर प्रकरण असतानाही पोलीस आणि सरकार मूग गिळून गप्प आहेत. न्यायासाठी स्व.महादेव मुंडे यांच्या पत्नी सातत्याने आंदोलन करत आहेत. काही दिवसांपूर्वी तर अक्षरशः त्यांनी बीड पोलीस अधीक्षकांच्या कार्यालयासमोर आंदोलन करत विष प्राशन केले होते. जर न्यायाच्या मागणीसाठी आपल्या एका भगानिला विष प्राशन करण्याची वेळ येत असेल तर ही लाजिरवाणी बाब आहे. त्यामुळे स्व.महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय नसून आता स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणात न्यायासाठी ज्याप्रकारे आंदोलन केले होते त्याचप्रकारे आंदोलन उभे करावे लागणार आहे. या अनुषंगाने आज बीड दुपारी १२ वाजता रामकृष्ण लॉन्स येथे संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्वधर्मीय, सर्वजातीय, सर्वपक्षीय बैठक होणार आहे. स्व.महादेव मुंडे व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय देण्यासाठी या बैठकीस सर्व सम ाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२१५/२०२५**

अर्जदार- १) शांताबाई भ्र. शामसुंदर जोजारे, वय-७१ वर्षे, धंदा-घरकार, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड. २) नंदराज पि. शामसुंदर जोजारे, वय ४३ वर्षे, धंदा व्यापार, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड. (३) नंदकिशोर पि. शामसुंदर जोजारे, वय ४७ वर्षे, धंदा व्यापार, रा.मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड. ४) दिपा भ्र. नंदकुमार जोजारे, वय-३७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड. ५) वैष्णवी पि. नंदकुमार जोजारे, वय २१ वर्षे धंदा घरकाम, रा.मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड. ६) वैभव पि. नंदकुमार जोजारे, वय २० वर्षे, धंदा-शिक्षण, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड, ता. जि. बीड. ७) गौरव पि. नंदकुमार जोजारे अ.पा.क आई अर्जदार क्र. ५. वय १६ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. सदर. ८) स्वाती . सुनिल टाक, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. स्वर्णलक्ष्मी निवास, इदगाह रोड, गजानन नगर, बीड, विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे शामसुंदर गोविंदराव जोजारे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नाम शामसुंदर गोविंदराव जोजारे, रा. मंत्री गल्ली, बीड, ता. जि. बीड हे दिनांक ११/०४/२०२५ गंजी मंत्री गल्ली, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र. ५ ते ७ हे अर्जदार क्र. ४ व मयत मुलगा नंदकुमार यांची अपत्ये आहेत म्हणजेच मयत शामसुदंर यांची नातू व नात मुली आहेत. अर्जदार क्र. ८ ही मयत शामसुंदर यांची विवाहीत मुलगी आहे. मयताचा मुलगा नामे नंदकुमार शामसुंदर जोजारे हे दि. ०९/०४/२०२५ गंजी मयत झालेले आहेत. तसेच मयत शामसुंदर यांचे आई-वडिल हे फार पूर्वीचे मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणं आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येत की. सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिलं जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक ०८/०९/२०२५**

आज दिनांक ३१/०७/२०२५ गंजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**(मार्फत- ॲड. धांडे एम. डी.)**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

## जाहीर प्रगटन

### मा. श्रीमती पी डी चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.

**किरकोळ दिवाणी अर्ज ७६४/२०२५**

**विजयमाला भ्र. बबन गायकवाड व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- १. विजयमाला भ्र. बबन गायकवाड, वय - ४४ वर्षे, धंदा-घरकाम, रा. लिंबागणेश ता. जि. बीड, २. सुरज पि. बबनराव गायकवाड, वय-२५ वर्षे, धंदा-मजुरी, रा. सदर, ३. आकाश पि. बबनराव गायकवाड, वय-२५ वर्षे, धंदा-मजुरी, रा. सदर, ४. उर्मिला भ्र. सुरज पवार, वय-२७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. राजुरी नवगण, ता. जि. बीड

(अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बबन पि. दत्तु गायकवाड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत बबन पि. दत्तु गायकवाड यांचा मृत्यु दिनांक २०.०८.२०२४ रोजी लिंबागणेश, ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असुन अज्रदार के २ व ३ हे मयताचे जुळे मुले आहेत. तसेच अर्जदार क ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते. की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत बबन पि. दत्तु गायकवाड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ मे २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३/०९/२०२५**

**(मार्फत- ॲड. डी एम रोटे)**

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शुक्रवार, दि. ०१ ऑगस्ट २०२५ • पान ४

# ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिरातील वंशपरंपरागत पुजाऱ्याशी जबरदस्तीने पैसे हिसकावले !

## विश्वस्त राजेश देशमुख सह तिघांविरोधात तक्रार दाखल

परळी वै. । प्रतिनिधी

परळीतील प्रसिद्ध वैद्यनाथ मंदिरातील वंशपरंपरागत पुजारी विवेक शंकर पुजारी यांनी गंभीर आरोप करत परळी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, दिनांक २८ जुलै २०२५ रोजी रात्री ९ ते १० वाजण्याच्या दरम्यान शयन आरतीच्या वेळेस ओम



नागनाथअप्पा वाघमारे, विजय नारायणअप्पा घोंगडे आणि जगन्नाथ बाबुराव वाघमारे या तिघांनी वैजनाथ देवल कमिटीचे विश्वस्त राजेश देशमुख यांच्या सांगण्यावरून त्यांच्या हातातील भक्तांनी स्वेच्छेने दिलेली दक्षिणा जबरदस्तीने हिसकावून घेतली.

विशेष म्हणजे, हे कृत्य त्यांनी जयवंत उर्फ राजेश विठ्ठलराव देशमुख यांच्या सांगण्यावरून केल्याचे स्पष्टपणे बोलून दाखवले, असे पुजारी विवेक शंकर पुजारी यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. तक्रारदाराच्या मते, राजेश देशमुख हे देवस्थानचे विश्वस्त असून सूडबुद्धीने सातत्याने मानसिक व शारीरिक त्रास देत आहेत, तसेच जातीवाचक शब्द वापरत अपमान करत आहेत. या घटनेमुळे विवेक पुजारी यांना अत्यंत मानसिक त्रास झाल्याचे ते म्हणाले. त्यांनी हायपरटेन्शनचा झटका आल्याने शुद्ध हरपली आणि त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजेच २९ जुलै रोजी त्यांना रुग्णालयातून सुटका देण्यात आली. पुजारी यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, जयवंत देशमुख हे सतत त्रास देत असून भविष्यात त्यांच्या किंवा त्यांच्या कुटुंबीयांच्या जिवीताला धोका निर्माण झाला, तर त्याला जबाबदार जयवंत उर्फ राजेश देशमुख असतील. या प्रकरणी परळी शहर पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी संबंधित घटनेची चौकशी सुरू केली आहे. विवेक पुजारी यांनी या गंभीर प्रकारावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# रस्त्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करणार

## आडस येथील दशरथ आकुसकर यांच्यासह शेतकऱ्यांचा इशारा ; तीन वर्षांपासून रस्ता खुला होईना

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील आडस येथील शेतकऱ्यांचा रस्त्याचा संघर्ष तब्बल तीन वर्षांपासून सुरू आहे. सार्वजनिक नकाशावर स्पष्ट असलेला रस्ता प्रत्यक्षात अडवण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतीला पोहोचता येत नाही. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. यासंदर्भात दि.३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन छेडण्याचा इशारा तक्रारदार दशरथ योगीराज आकुसकर व इतर शेतकऱ्यांनी दिला आहे.

आडस येथील दशरथ आकुसकर यांच्या प्रकरणात ३३ फूट रुंदीचा रस्ता ६०-६५ वर्षांपासून



नकाशावर अस्तित्वात असून तो अडवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. ▶ उर्वरित पान २ वर

### • कारवाईऐवजी फक्त आदेश, शेतकऱ्यांत नाराजी

**प्रशासनाच्या स्पष्ट आदेशानंतरही अंमलबजावणी होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. रस्ता खुला करण्याची मागणी करत अनेक वेळा प्रशासन दरवाजे ठोठावले तरी केवळ लेखी आदेश मिळतात; प्रत्यक्षात कारवाई होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्धार केला आहे.**

### • शेती पडीक, चार गुन्हे दाखल ; प्रशासन अजूनही दुर्लक्ष करतंय !

**आडस येथील रस्ता वादाच्या पार्श्वभूमिवर गेल्या तीन वर्षांत चार परस्परविरोधी गुन्हे दाखल झाले आहेत. तरी देखील महसूल यंत्रणेकडून प्रश्नाच्या मुळाशी जाऊन तोडगा काढण्याऐवजी टाळाटाळ होत आहे. रस्ता बंद असल्याने काही शेतकऱ्यांची शेती पडीक पडली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसानही होत आहे. याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे.**

# बाल संरक्षणावर जिल्हास्तरीय कार्यशाळा बीडमध्ये उद्या आयोजन

बीड । प्रतिनिधी

युवा ग्राम विकास मंडळ, बीड आणि महिला व बाल विकास कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बाल संरक्षण जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २ ऑगस्ट २०२५ रोजी, अन्विता हॉटेल, जालना रोड, बीड येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. बालकांवरील अत्याचार (POCSO) आणि बाल विवाह प्रतिबंधक कायद्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे कशी करावी, यावर या कार्यशाळेत मार्गदर्शन केले जाणार आहे. या फ ▶ उर्वरित पान २ वर

# सामाजिक व धार्मिक उपक्रमांनी मंत्री पंकजा मुंडे यांचा वाढदिवस माजलगाव भाजपा वतीने साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने दिनांक २६ जुलै शनिवार रोजी सकाळी सात पासून ते सायंकाळी सात पर्यंत विविध सात उपक्रमानी ताईचा वाढदिवस सामाजिक धार्मिक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सकाळी सिद्धेश्वर मंदिर येथे वेद शास्त्र संपन्न ब्रह्म वृद्धांच्या मंत्रोच्चारामध्ये ताईस उत्तम आरोग्य उदंड आयुष्य लाभावे व त्यांच्या हातून अशीच अविरत सेवा कार्य घडत राहावे व त्यांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी असा संकल्प करून पूजा करून आरती करून अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सकाळी नऊ वाजता माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी कीट्टी



आडगाव मंडळ अध्यक्षा रूपाली कचरे यांनी पालावरील लोकांना किराणा वाटप केल्या व अरुण राऊत यांनी पालावरील महिलांना साड्या वाटप व पर्यावरण पूरक पिशवी वितरण करण्यात आल्या. दहा वाजता महात्मा फुले शाळेत डॉ.प्रशांत पाटील यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले . आयटीआय कॉलेज येथे वृक्षारोपण हे अरुण राऊत यांनी तर ज्ञानेश्वर माऊली सरवदे यांनी मंगलनाथ मंदिर येथे ताई साहेबांच्या दीर्घायुष्यासाठी मंगल नाथाची महाआरती व मंगलनाथ मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामीण रुग्णालयात ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्याची तपासणी, विनायक रत्नपारखी यांच्या वतीने रुग्णांना फळ वाटप आणि सर्वात शेवटी आज श्रावणी पहिला शनिवार निमित्त ह्या योगा योगाने महारूद्र हनुमानाची आरती व रूपाली कचरे यांच्यावतीने राम नाम जपाच्या पुस्तकांचं वाटप या सामूहिक लेखनामधून दोन लाख ३१ हजार राम जप आदरणीय ताई साहेबांच्या दीर्घायुष्यासाठी करण्यात आले. या विविध कार्यक्रमास ज्ञानेश्वर मेंडके डॉ अशोक तिडके दीपक मुंडे सत्यनारायण उनवणे ज्ञानेश्वर सरवदे ईश्वर खुरपे ▶ उर्वरित पान २ वर

# छाया पांचाळ मृत्यू प्रकरणातील दोषी डॉक्टर, नर्स यांच्यावर कारवाईची मागणी

## न्यायासाठी सोमवारपासून आंदोलन : किष्किंधा पांचाळ, गणेश पांचाळ



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा रुग्णालयात दि. १३ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री प्रसुतीदरम्यान अतिरक्तस्त्रावामुळे मृत्यूमुखी पडलेल्या छाया गणेश पांचाळ, वय- २५, रा. आंबिलवडगाव, ता.जि. बीड. या महिलेच्या मृत्यू प्रकरणात मुख्य दोषी डॉक्टर व नर्स यांच्यावर कारवाई टाळत कोणताही संबंध नसणाऱ्या परिचर मावशीवरच निलंबनाची कारवाई केल्याचा आरोप करत किष्किंधा पांचाळ (अध्यक्ष, विश्वकल्याण महिला सेवाभावी संस्था) आणि मयत ▶ उर्वरित पान २ वर

# टिपरे महोत्सवात ओम ग्रुप प्रथम पारितोषिकाचा मानकरी

# आ. विजयसिंह पंडित यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

शारदा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित टिपरे महोत्सवात टिपरे स्पर्धा सांघिक मध्ये ओम ग्रुप प्रथम पारितोषिकाचा मानकरी ठरला. संघर्ष क्रीडा मंडळ द्वितीय पारितोषिकाचे मानकरी ठरले तर तृतीय पारितोषिक जगदंबा ग्रुपला आणि उत्तेजनार्थ अनुक्रमे सावतानगर ग्रुप आणि झुंजार ग्रुपला प्रदान करण्यात आले. टिपरे महोत्सवाचे आयोजक आ. विजयसिंह पंडित आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत



### • टिपरे महोत्सवाचे आयोजक

**आ. विजयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सर्व विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आले यावेळी नागमंत्री या कलाप्रकारातही माटेगावच्या भजनी मंडळाचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून ड. सुभाष निकम, विलास सोनवणे, प्रशांत रुईकर, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रकाश भुते यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी टिपरे महोत्सवाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

उपस्थितीमध्ये स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व स्मृती चिन्हाचे वाटप करण्यात आले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दिनांक ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात

### बीड जिल्ह्यात ४ ऑगस्टपासून डाक विभागाची नवी प्रणाली

बीड । प्रतिनिधी

भारतीय डाक विभागाने डिजिटल उत्कृष्टतेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत पुढील पिढीच्या प्रणालीची घोषणा केली आहे. बीड विभागातील सर्व टपाल कार्यालयांमध्ये ४ ऑगस्ट २०२५ पासून ही अपग्रेड केलेली नवी प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. या संक्रमणासाठी २ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व कार्यालये बंद ठेवण्यात येणार असून, कोणतेही सार्वजनिक व्यवहार होणार नाहीत. डेटा मायग्रेशन, प्रणालीचे वैधीकरण आणि कॉन्फिगरेशनच्या प्रक्रियेसाठी हा डाऊनटाईम अत्यावश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. नवीन डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे टपाल सेवा अधिक जलद, सुरक्षित व ग्राहक-अनुकूल होणार असून, स्मार्ट व भविष्यनिश्चित प्रणालीचा अनुभव ग्राहकांना मिळणार आहे. डाक विभागाच्या अध्यक्षांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे नागरिकांना सहकार्याचे आवाहन केले आहे.

### अनेक उपोषणे, आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या उबाळेंवर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

कौटूंबिक प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतरही फिर्यादी उबाळे यांनी तपासावर आक्षेप घेत अनेकवेळा उपोषणे केली. २५ जुलै रोजी नाळवंडी नाका परिसरातील पाण्याच्या टाकीवर चढून आत्महत्येची धमकी देणाऱ्या नितीन किरण उबाळे याच्याविरूध्द शिवाजीनगर आणि पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तत्कालीन पोलीस निरीक्षकांनी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तुमच्या गुन्ह्याचा तपास करून ब समरी न्यायालयात दाखल केली आहे. तपासाबाबत काही आक्षेप असल्याने तुम्ही न्यायालयात हजर राहून कळवावे असे सांगितले. तरीही नितीन उबाळे यांनी त्यांचे न ऐकता अनेकवेळा उपोषणे केली, पाण्याच्या टाकीवर चढून आत्महत्येची धमकी दिली, उबाळेंची मागणी ही बेकायदेशिररित्या कृत्य करून प्रशासनाला वेठीस धरण्याचा प्रयत्न करणारी असल्याने उबाळे यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे अशी बेकायदेशिर कृत्य करणाऱ्या इसमांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश पोलीस अधिक्षकांनी दिलेले आहेत.

### दहावी निकालानंतर विद्यार्थ्यांसाठी HSC व्होकेशनल अभ्यासक्रम उत्तम पर्याय

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा दहावीचा निकाल यंदा ९५ टक्के लागून विभागात प्रथम क्रमांकाने उजळला आहे. निकालानंतर विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणासाठी योग्य पर्याय निवडण्याचे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी डॉ. पी. डी. उखळीकर यांनी केले आहे. १० वी नंतर मेडिकल व इंजिनिअरिंगसाठी विज्ञान शाखा हे उत्तम पर्याय असून हे प्रामुख्याने ९० टक्केपेक्षा अधिक गुणधारक विद्यार्थ्यांसाठी सुचविण्यात आले आहे. दरम्यान, ६० ते ९० टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निक, आयटीआय आणि डी-फार्मसीसारखे व्यावसायिक अभ्यासक्रमही अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. ३५ ते ६० टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना एच.एस.सी. व्होकेशनल (+२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय) अभ्यासक्रम हे उत्कृष्ट पर्याय ठरू शकतात. 'MCVC' नावाने ओळखले जाणारे हे अभ्यासक्रम ७० टक्के व्यवसाय व ३० टक्के सामान्य शिक्षणाचा समावेश करतात. बीड जिल्ह्यात कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी, फूड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, अकौंटिंग व ऑफिस मॅनेजमेंट, फायनान्शियल सर्व्हिसेस व इन्शुरन्स, लॉजिस्टिक व सप्लाय चेन मॅनेजमेंट, मेडिकल लॅब टेक्निशियन, ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी, हॉर्टिकल्चर, चाईल्ड व ओल्ड एज केअर सर्व्हिसेस, ऑप्थॉलमिक व एक्स-रे टेक्निशियन हे विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या अभ्यासक्रमांसाठी अनुभवी व उच्च शिक्षित शिक्षक वर्ग कार्यरत असून कमी प्रवेश फीसमध्ये सहज प्रवेश मिळवता येतो. इच्छुक विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी शिवाजी खाडे (मो. ९३२५७१२२७८), दीपक देशमुख (९४२२२९५३४८), शेख जावेद पाशा (७३८५७७६७८६), छाया खोसे (८८०६७१७१०६) यांच्याशी किंवा चंपावती शाळेच्या पाठीमागे, शासकीय आयटीआय परिसरातील जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रेड रिबन प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न



बीड । प्रतिनिधी

महराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुबंई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार आंतरराष्ट्रीय युवा दिन व पंधरवाडा १२ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट या कालावधीत राबविला जातो. त्या अनुषंगाने जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, (डापकु), जिल्हा रुग्णालय बीड यांच्या वतीने शासकीय नर्सिंग कॉलेज बीड येथे रेड रिबन प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन आज दिनांक ३०/०७/२०२५ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी जिल्हयातील एकुण ३९ विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला जिल्हा शल्यचिकित्सक डॉ संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सदर स्पर्धा घेण्यात आली प्रथम क्रमांक हा संस्कार विद्यालय बीड येथील तावरे समर्थ सचीन रु. १५००/- प्रमाणपत्र व मेडल, तर तेथीलच कुरे आर्यन भास्कर द्वित्तीय क्रमांक विजेत्यांना रु. १०००/- प्रमाणपत्र व मेडल व तृत्तीय क्रमांक राठी मानसी रवींद्र द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीड विजेत्यास रु. ५००/- प्रमाणपत्र व मेडल देऊन सर्व मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेमधुन अनुक्रमे युवक गटातून विजेते ठरलेल्या प्रथम विजेते स्पर्धकास मुबंई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय प्रश्न मंजुषा स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला समुपदेशक श्री जनार्दन माचपल्ले यांनी स्पर्धेतील नियमावली विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. संस्कार विद्यालयाचे शिक्षक शामसुंदर घाटगे यांनी या प्रसंगी आपले विचार विशद करतांना आरोग्यासाठी हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून आजच्या स्पर्धेच्या माध्यमातून आमचे विद्यार्थी आरोग्य दूत म्हणून काम करतील असें सांगितले.कार्यक्रमासाठी चंपावती विद्यालयातील श्री उध्दव घाटगे यांची उपस्थिती होती. शासकीय नर्सिंग कॉलेज जिल्हा रुग्णालय बीड येथील प्राचार्या सुवर्णा बेदरे यांनी सर्व उपस्थित सहभागी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले, एचआयव्ही/एड्स जनजागृतीसाठी युवकांनी पुढे येण्याचे अवहान करुन विविध स्पर्धेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे अवाहन केले. तर अध्यक्षीय समारोप डॉ. लक्ष्मीकांत तांदळे यांनी केला त्यांनी सहभागी व विजेत्या स्पर्धकाचे अभिनंदन करुन राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विजेत्यांना पुढील स्पर्धेमध्ये यशस्वी होण्याच्या शुभेच्छा दिल्या तसेच जिल्न्हा रुग्णालय बीडच्या वतीने ▶ उर्वरित पान २ वर